# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम
माहिती पुस्तिका
२०१० - २०११

Created by Neevia docuPrinter trial version

**महामहीम के. शंकर नारायणन**
कुलपती,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
आणि राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,
दूरध्वनी क्र. (०२२) २३६३२६६०
फॅक्स क्र. (०२२) २३६३३२७२

**मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात**
कृषिमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि प्रतिकुलपती
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दूरध्वनी क्र. (०२२) २२०२५३०८
फॅक्स क्र. (०२२) २२०२४५९२

**मा. ना. श्री. विजयराव कोलते**
उपाध्यक्ष, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
दूरध्वनी क्र. (०२०) २५५३७४८१
फॅक्स क्र. (०२०) २५५३३७६४

**डॉ. विजय बाळकृष्ण मेहता**
कुलगुरु,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १०९
फॅक्स क्र. (०२३५८) २८२०७४

**डॉ. गोविंद दिनकर जोशी**
शिक्षण संचालक,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
कार्यालय (०२३५८) २८२४११, विस्तार १३१
फॅक्स व दूरध्वनी क्र. (०२३५८) २८४३०८

**डॉ. हणमंत कृष्णा पाटील**
सहयोगी अधिष्ठाता,
निम्नस्तर कृषि शिक्षण,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १२२
फॅक्स क्र. (०२३५८) २८२०७४/२८४३०८

**श्री. प्रविणकुमार अण्णा यादव**
कुलसचिव,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १५७
फॅक्स (०२३५८) २८३०६५

**श्री. प्रविणकुमार अण्णा यादव**
उपकुलसचिव,
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
दूरध्वनी क्र. (०२३५८) २८२४११, विस्तार १२५

**Created by Neevia docuPrinter trial version**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ४ |
| २ | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत कृषि तंत्र विद्यालयांची नावे | ५ ते ७ |
| ३ | प्रवेश पात्रता | ७ |
| ४ | उमेदवारांसाठी सूचना | ८ ते ११ |
| ५ | प्रवेश पध्दत | ११ ते १३ |
| ६ | आरक्षित जागा | १३ ते १४ |
| ७ | अधिभार | १४ |
| ८ | अभ्यासक्रम, अध्यापन आणि मूल्यमापन | १५ |
| ९ | प्रमाणपत्र | १५ |
| १० | परीक्षा शुल्क, परीक्षेचा अर्ज, प्रवेशपत्र इत्यादी | १६ |
| ११ | वैद्यकीय प्रमाणपत्र | १६ |
| १२ | उपस्थिती | १६ |
| १३ | पूनः प्रवेश | १६ |
| १४ | पुनः परिक्षा | १६ |
| १५ | विद्यार्थ्यांची जबाबदारी | १७ |
| १६ | शैक्षणिक सहली | १७ |
| १७ | वसतीगृह निवास | १७ |
| १८ | अनुचित गैरवर्तन | १७ |
| १९ | शैक्षणिक शुल्क | १७ ते १८ |
| २० | सूचना | १८ |
| २१ | कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम - प्रवेश कार्यक्रम २०१०-११ | १९ |
|  | परिशिष्ठ – १ शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना) | २० |
|  | परिशिष्ठ – २ शेतकरी असल्याचा दाखला (नमूना) | २१ |
|  | परिशिष्ठ – ३ वैद्यकीय दाखला (नमूना) | २२ |


Created by Neevia docuPrinter trial version

## १. प्रस्तावना

दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि बृहन्मुंबई या पाच जिल्हयात आहे.

या विद्यापीठात उच्चस्तर पदवी शिक्षण कार्यक्रमांतर्गत कृषि, वनिकी, कृषि अभियांत्रिकी आणि मत्स्य विज्ञान या विद्याशाखा आहेत. त्याचबरोबर निम्नस्तर कृषि विद्याशाखेंतर्गत विविध पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. निम्नस्तर विद्याशाखेतील कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमामध्ये २००० साली बदल करण्यात आला. सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळास अनुरुप अभ्यासक्रम राबविण्याच्या सुचना राज्य शासनाकडून प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सांगोपांग चर्चा झाली. कृषि परिषदेच्या दिनांक ३० जून २००७ रोजी झालेल्या बैठकीतील ७२ व्या ठरावान्वये दोन वर्षे कालावधीचा कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम बदलण्यात आला. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमामध्ये प्रथम आणि द्वितीय वर्षासाठी एकूण १२ विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. याशिवाय 'कृषि आधारित उद्योग' हा कार्यानुभवावर आधारीत स्वतंत्र अभ्यासक्रम त्यात समाविष्ट केला आहे. परिणामतः महाराष्ट्र राज्याच्या, विशेषतः कोकण विभागाच्या कृषि क्षेत्राच्या विकासाच्या गरजा लक्षात घेवून, कृषि आणि पूरक व्यवसायातील उच्चस्तरीय प्रशिक्षित तज्ञ मनुष्यबळ निर्माण करण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे.

सुधारीत कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम शिकविणारी कोकणातील कृषि तंत्र विद्यालये, प्रवेश प्रक्रिया इ. तपशील या माहिती पुस्तिकेमध्ये देण्यात आला आहे.

Created by Neevia docuPrinter trial version

**२. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या कृषि तंत्र विद्यालयांची नावे व तपशील**

**शैक्षणिक अर्हता - १० वी उत्तीर्ण** **शिक्षण कालावधी - २ वर्षे**

| अ.क्र. | शाळेचा सांकेतांक | कृषि तंत्र विद्यालयाचे नाव | दूरध्वनी क्रमांक | प्रवेश क्षमतेविषयी शेरा |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | २१४१०३ | कृषि तंत्र विद्यालय, रोहा, जि. रायगड (घटक) | (०२१९४) २६३६६७ मोबा. ९४२३२९६१३९ | रायगड जिल्हयासाठी ६० |
| २ | २१५१०२ | कृषि तंत्र विद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी (घटक) | (०२३५१) २३००४२ मोबा. ९४२३३०३२३२ | रत्नागिरी – ३०<br>सिंधुदुर्ग - ३० |
| ३ | २१३१०४ | कृषि तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, जि.ठाणे (संलग्न) | (०२५२८) २४१०३९ मोबा. ९२७००३८६१७ | ठाणे जिल्हयासाठी ५० |
| ४ | २१३१०५ | महात्मा गांधी आदिवासी जनता कृषि तंत्र विद्यालय, कोसबाड हिल, जि. ठाणे (संलग्न) | (०२५२८) २४१५१६ मोबा. ९२२०२०५४२२ | (ठा ो, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार व अहमदनगर जिल्हयातील फक्त आदिवासी उमेदवारांकरिता)<br>रायगड ८, नाशिक ८, धुळे ८, नंदुरबार ८, अहमदनगर - ८, ठाणे १० |

**शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये खालील खाजगी मान्यताप्राप्त कृषि तंत्र विद्यालयांमध्ये कृषि पदविका अभ्यासक्रम कार्यरत आहे.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २१३१०६ | कृषि तंत्र विद्यालय, सरळगांव, ता. मुरबाड, जि. ठाणे | (०२५२४) २४०७७० मोबा. ९४२३९२३३९५ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| ६ | २१३३५७ | कृषि तंत्र विद्यालय, सोनिवली, पो. एरंजाड, ता. अंबरनाथ, जि. ठाणे. | (०२५१) २६७४८४५ मोबा.९३२४८८८१७९ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| ७ | २१३१०८ | श्री तिसाई कृषि तंत्र विद्यालय, लेनाड, बु.।।, ता. शहापूर, जि. ठाणे | (०२५२७) २३७१३९ मोबा. ९४२३०२६६०० | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| ८ | २१३११४ | कृषि तंत्र विद्यालय, खानिवली, पो. वाशिंद, ता. भिवंडी, जि. ठाणे | (०२५२२) २०२६२३ मोबा.९२२४३४१८८३ ९२२६१५६६८४ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| ९ | २१३१०९ | केशव सृष्टी कृषि तंत्र विद्यालय, उत्तन भाईंदर, जि. ठाणे | (०२२) २८४५१२२५ मोबा. ९२२६९४३३७२ ९८६९०४०२१४ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| १० | २१३११० | सुदाम कृषि तंत्र विद्यालय, कुडवली, ता. मुरबाड, जि. ठाणे | मोबा.९२२६२३७२२८ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |
| ११ | २१३११२ | कृषि तंत्र विद्यालय, कोळींब, ता. कल्याण, जि. ठाणे | (०२५१) २३१६८८१ २०२२३१० मोबा.९४२०८०६४५८ | ठाणे जिल्हयासाठी – ६० |

Created by Neevia docuPrinter trial version

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १२ | २१३११३ | कृषि तंत्र विद्यालय, आसनगांव, ता. डहाणू, जि. ठाणे | (०२५२८) ६८२२९७<br>मोबा. ९२७०८८७८२३ | ठाणे<br>जिल्हयासाठी – ६० |
| १३ | २१४३५८ | कृषि तंत्र विद्यालय, सांगुर्ली, शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड | मोबा.९८७०४६७१६१,<br>९७६७३१९१५१ | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १४ | २१४३५९ | कृषि तंत्र विद्यालय, मु. पो. गालसुरे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड | (०२१४७) २७८४७१<br>मोबा. ९४२०३२३६४६ | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १५ | २१४११७ | प्रा. च. रं. म्हसे कृषि तंत्र विद्यालय, वारे, पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड | (०२१४८) २०४०२६<br>मोबा. ९८५०६७१५१०<br>९२०९१९६३९८ | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १६ | २१४३५४ | कृषि तंत्र विद्यालय, नांदगांव खुर्द, पो. तळोशी, ता. महाड, जि. रायगड | (०२१४५) २७६९८०<br>मोबा. ९२२६१४६७२० | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १७ | २१४११८ | कै. मोतीराम जगताप कृषि तंत्र विद्यालय, कोकरे, तर्फे नाते, पो. आचळोली, ता. महाड, जि. रायगड | मोबा. ९९२१२४१७१७<br>९८८१८५८१८८ | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १८ | २१४१३४ | अशोकदादा साबळे कृषि तंत्र विद्यालय, माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड | (०२१४०) २६३९२९<br>मोबा. ९७३०६४७८५५ | रायगड<br>जिल्हयासाठी – ६० |
| १९ | २१५११९ | कृषि तंत्र विद्यालय, सुकीवली, ता. खेड, जि. रत्नागिरी | (०२३५६) २६१०८३<br>मोबा. ९९७०८१६८५५ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |
| २० | २१५३६० | कृषि तंत्र विद्यालय, खवटी, ता. खेड, जि. रत्नागिरी | (०२३५६) २०५८०९,<br>२०५०७८<br>मोबा. ९४२११३४९८५<br>९९२१६८६७०१ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |
| २१ | २१५१२२ | द. ग. तटकरे कृषि तंत्र विद्यालय, खरवते-दहिवली, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी | (०२३५५) २६४०१७<br>मोबा. ९२२६१७५३२१ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |
| २२ | २१५१२१ | महात्मा फुले कृषि तंत्र विद्यालय, असोंड, ता. दापोली, जि. रत्नागिरी | (०२३५८) २०३४५८<br>मोबा. ९४२०३७६८३२ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |
| २३ | २१५१२५ | पं. जवाहरलाल नेहरु कृषि तंत्र विद्यालय, टाळसुरे, ता. दापोली, जि. रत्नागिरी | (०२३५८) २८५५५४,<br>२८४५६७,<br>मोबा. ९२२४०२००८१ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |
| २४ | २१५१२३ | ए. बी. कृषि तंत्र विद्यालय, शिरगांव, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी | (०२३५०) ६९५३१९,<br>२२५४९७,<br>मोबा. ९४२०१५६२२४ | रत्नागिरी<br>जिल्हयासाठी – ६० |

Created by Neevia docuPrinter trial version

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २५ | २१५१२६ | कृषि तंत्र विद्यालय, सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी | (०२३५५) ६९०४१६ मोबा. ९२२६१७५३२१ | रत्नागिरी जिल्हयासाठी – ६० |
| २६ | २१५१२७ | शरद केळकर कृषि तंत्र विद्यालय, मांडकी-पालवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी | (०२३५५) २३३११७, २३३१८१, २३३१३६ मोबा. ९४२११५४५९४ | रत्नागिरी जिल्हयासाठी – ६० |
| २७ | २१५१२८ | प्रा. मधु दंडवते कृषि तंत्र विद्यालय, देवरुख, (मातृमंदिर), ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी | (०२३५२) २२८९१४ मोबा. ९४२१५५२६९२ | रत्नागिरी जिल्हयासाठी – ६० |
| २८ | २१६१३१ | कृषि तंत्र विद्यालय, डिगस, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | (०२३६२) २३०१५२ मोबा. ९४२११८९६५६ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| २९ | २१६३५६ | कृषि तंत्र विद्यालय, पाडलोस, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग | मोबा. ९२७२४११७२७, ९४२२५९६४३४ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३० | २१६१३० | कृषि तंत्र विद्यालय, सांगुलवाडी, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग | (०२३६७) २३७३७० मोबा. ९९२२१२३६०८ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३१ | २१६१९४ | कृषि तंत्र विद्यालय, माडखोल, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग | (०२३६३) २८०४२१, मोबा. ९८६९८३६९८१ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३२ | २१६३५३ | कै . काकासाहेब तावडे कृषि तंत्र विद्यालय, वडाचापाट, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग | (०२३६५) २२०६२३ मोबा.९४२११४९६७६ ९४२२०५५२४७ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३३ | २१६१३३ | श्री सरस्वती कृषि तंत्र विद्यालय, तोंडवली, नांदगांव तिठ्याजवळ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग | (०२३६७) २४८५८९ मोबा. ९८६०८१०९७७ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३४ | २१६३५५ | कृषि तंत्र विद्यालय, वळीवंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग | (०२३६४) २३६३८९ मोबा. ९४२१२६८३९५ ९४२२३७९९१६ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३५ | २१६१३२ | श्रीमती सुमती मराठे कृषि तंत्रज्ञान विद्यालय, फोंडाघाट, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राजवळ, फोंडाघाट, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग | (०२३६७) २८०५१४ मो. मोबा. ९८५००२९५९३ ९४२१२६७१४८ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३६ | | कृषि तंत्र विद्यालय, हरकुळ बुद्रुक, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग | (०२३६७) २८०५१४ मोबा. ९९२१८७६७७३ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |
| ३७ | | कृषि तंत्र विद्यालय, आंबेली, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग | (०२३६२) २२८८२१ / २२८८१२ मोबा. ९४२२४३४५६७ | सिंधुदुर्ग जिल्हयासाठी – ६० |

Created by Neevia docuPrinter trial version

## ३. प्रवेश पात्रता

कृषि तंत्र विद्यालयामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (एस.एस.सी.- १० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा.

## ४. उमेदवारांसाठी सूचना

४.१. प्रवेशासाठी विहित नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

४.२. प्रत्येक उमेदवाराने फक्त एकच प्रवेश अर्ज भरावा.

४.३. उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (मूळ प्रती जोडू नयेत) पुढील अनुक्रमांकानुसार जोडाव्यात.

४.३.१ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचे गुणपत्रक

४.३.२ ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालय/महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतु प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराने ७ दिवसाच्या आत शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला आहे तेथे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच ज्या उमेदवाराचा काही कारणाने शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्या संबंधीचे तहसीलदार यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४.३.३ उमेदवाराचे वडील/आई अथवा आजोबा/आजी यांचे नांवे शेतजमीन आहे, असे दर्शविणारा तलाठी यांनी दिलेला २००९ किंवा २०१० या वर्षाचा ७/१२ व ८अ चा उतारा जोडावा. जर उमेदवाराचे आई/वडील हयात नसतील तर उमेदवाराचे भाऊ / बहीण अथवा पितृ/मातृ कुळाकडील चुलते, मामा यांचे नांवे शेतजमीन असलेला ७/१२ चा उतारा उमेदवाराने जोडल्यास सदर शेतजमिनीत उमेदवाराचा कायदेशीर हिस्सा असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर केले तर अशा उमेदवारास १२ गुणांचा अधिभार मिळण्यास तो पात्र राहील. उमेदवारास सूचीत करण्यात येते की, ७/१२ उता-याच्या आवश्यक त्या साक्षांकित केलेल्या प्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

Created by Neevia docuPrinter trial version

४.३.४ भूमीहीन शेतमजूर असल्याबाबतचे प्रमाणपत्र : उमेदवाराचे वडील/आई भूमीहीन शेतमजूर असल्यास भूमीहीन शेतमजूराचे उपजीविकेचे शेतमजूरी करणे हे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे जरूरीचे आहे. हे प्रमाणपत्र तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे सही शिक्क्यानिशी सन २००९ व २०१० या वर्षातील असावे (दाखल्यावर उमेदवाराच्या नावाचा उल्लेख असावा) सदर प्रमाणपत्रधारक उमेदवार शेतकरी कुंटुब (AG category) ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही.

४.३.५ सन २००९-१० या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र, या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी / आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीद्वारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे, असे नमूद केलेले असावे.

४.३.६ उप जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी/तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहित नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

४.३.७ विमुक्त जाती - अ, भटक्या जमाती - ब, भटक्या जमाती - क, भटक्या जमाती – ड, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक १-४-२०१० नंतर दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

४.३.८ प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला : महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी (District Rehabilitation/Resettlement Officer) यांनी उमेदवार/वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिल/आई किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली / झालेली आहे असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर **या सवलतीचा फायदा ज्यांना द्यावयाचा आहे, त्यांच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

४.३.९ राष्ट्रीय सेना (एन्.सी.सी.) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थलसेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक/मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र.

Created by Neevia docuPrinter trial version

४.३.१० उमेदवाराने इ. ८ वी ते १० वी या कालावधीत क्रीडा/सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला असल्यास, जिल्हा क्रीडा अधिकारी/क्रीडा परिषद/जिल्हा शिक्षणाधिकारी/तालुका पातळीवरील अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र अधिभारासाठी ग्राहय धरण्यात येईल. नोंदणीकृत्त क्रिडा असोसिएशनने प्राधिकृत्त केलेल्या क्रिडा स्पर्धांचा प्रमाणपत्रावर तालुका/जिल्हा क्रिडा अधिकारी यांची स्वाक्षरी असल्यास अधिभार द्यावा.

४.३.११ स्वातंत्र्यसैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्यसैनिकांचा मुलगा/मुलगी, मुलाचा/मुलीची, मुलगा/मुलगी यांना खालील अटींच्या अधीन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांचे सहीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यसैनिक यांचे खालील मुद्यांवरील रूपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

अ) उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.

ब) स्वातंत्र्यसैनिक हया सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.

क) स्वातंत्र्यसैनिक हया सवलतीचा उपयोग कुठल्याही नातेवाईकासाठी, जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.

४.३.१२ उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास संबंधीत सैन्याधिकारी/जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचा विहित नमुन्यातील दाखला जोडावा.

४.३.१३ उमेदवाराचे आई/वडील कृषि विद्यापीठे/कृषि परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र जोडावे.

४.३.१४ उमेदवार अपंग असल्यास त्याने जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा शासकीय रूग्णालय किंवा वैद्यकीय मंडळ यांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. प्रमाणपत्रामध्ये अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपगंत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.

४.३.१५ स्वतःची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल).

४.३.१६ अर्जासोबत सन २००९-१० या आर्थिक वर्षाचा तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

Created by Neevia docuPrinter trial version

४.३.१७ आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २००९-१० या वर्षाचा तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये १ लाखपर्यंत आहे.

४.४. सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेपूर्वी किंवा तोपर्यंत प्राप्त झालेला अर्ज प्रवेशासाठी ग्राहय धरला जाईल.

४.५. अपूर्ण भरलेले प्रवेश अर्ज खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे रद्द करण्यात येतील.

४.५.१ उमेदवाराने स्वतःची स्वाक्षरी न केलेला अर्ज

४.५.२ सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित केलेल्या नसतील तर

४.५.३ उमेदवाराचे वय ३० वर्षापेक्षा अधिक असेल तर

४.५.४ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) परीक्षेचे गुणपत्रक जोडलेले नसल्यास

४.६. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी किंवा गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल.

४.६.१ इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी

४.६.२ कमीत कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला उमेदवार

४.६.३ वयाने लहान असलेला उमेदवार

४.६.४ आडनावातील इंग्रजी आद्य अक्षरांचा क्रम.

४.७. प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

## ५. प्रवेश पध्दत

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमधील कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवेल. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसंबंधीतची माहिती महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या http://oasis.mkcl.org/agridiploma या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**५.१ उमेदवाराचा जिल्हा त्याने सादर केलेल्या अनुक्रम अधिवास दाखला (डोमिसाईल सर्टीफिकेट), ७/१२ चा उतारा, शाळा सोडल्याचा दाखला, १० वी गुणपत्रिका यावरून निश्चित केला जाईल.**

Created by Neevia docuPrinter trial version

५.२ अर्जदाराने प्रवेश अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या अधिकृत अध्ययन केंद्रावर [Authorised Learning Center (ALC)] संपर्क साधावा.

५.३ अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) रक्कम रु. २५/- रोखीने (रु. पंचवीस मात्र) भरुन अर्जदाराला प्रवेश अर्ज आणि माहितीपुस्तिका मिळेल.

५.४ अर्जदाराने संपूर्ण भरलेला प्रवेश अर्ज, आवेदन शुल्क (खुला संवर्ग रु. ३००/- आणि राखीव संवर्ग रु. १५०/-) रोखीने भरुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित (Attested) प्रतीसह अधिकृत अध्ययन केंद्रावर जमा करून पोहोच घ्यावी.

५.५ प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जावरून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ जिल्हानिहाय तात्पुरती गुणवत्ता यादी, संकेत स्थळावर आणि अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) प्रसिध्द करेल.

५.६ तात्पुरत्या गुणवत्ता यादीसंबंधी काही तक्रार/आक्षेप असल्यास, लेखी स्वरुपातील अर्ज पुराव्यासह महाराष्ट्र ज्ञान महामंडळच्या अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) विहित वेळेत सादर करावा.

५.७ अधिकृत अध्ययन केंद्रप्रमुखांनी जमा झालेले सर्व तक्रार अर्ज, विहित वेळेत संबंधित जिल्हयाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्याकडे जमा करावेत.

५.८ तात्पुरत्या गुणवत्ता यादीसंबंधीच्या तक्रारीबाबत विद्यापीठस्तरीय तक्रार निवारण समिती योग्य ते निर्णय घेवून ते सर्व निर्णय महाराष्ट्र ज्ञान महामंडळला ई-मेल द्वारे पाठविण्यात येतील. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) प्रसिध्द करण्यात येईल.

५.९ अंतिम गुणवत्ता यादी आणि उमेदावाराचा विकल्प लक्षात घेवून महाराष्ट्र ज्ञान महामंडळा तर्फे खाजगी विद्यालयाच्या व्यवस्थापन कोटयाच्या जागा सोडून जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय अंतिम प्रवेश यादया संबंधित घटक विद्यालयास पुरविण्यात येतील. तसेच सदरची अंतिम यादी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५.१० अंतिम प्रवेश यादी प्रसिध्द झाल्यानंतर, उमेदवाराने अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) जावून स्वतःचे तात्पुरते प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.

५.११ प्राप्त केलेले तात्पुरते प्रवेशपत्र, विहित प्रवेश शुल्क आणि मूळ कागदपत्रांसह प्रवेश कार्यक्रम प्रत्रिकेनुसार प्रवेश घेण्यासाठी उमेदवाराने संबंधित ज्या कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश घेतला असेल त्या कृषि तंत्र विद्यालयात जावून प्रवेश निश्चित करण्यासाठी स्वतः उपस्थित रहावे.

५.१२ प्रवेश देतेवेळी, सर्व कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य, आपआपल्याच कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश कार्यक्रम पत्रिकेनुसार प्रवेशप्रक्रिया पूर्ण करतील. जिल्हयातील सर्व विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालयांचे प्राचार्य यांनी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्रासह त्या त्या जिल्हयातील घटक व संलग्न कृषि तंत्र विद्यालयात उपस्थित राहून घटक व संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्यांकडून मूळ प्रमाणपत्र सादर करून विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करतील. (सिंधुदूर्ग जिल्हयातील सर्व कृषि तंत्र विद्यालयातील प्राचार्य हे प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथे उपस्थित राहून मूळ प्रमाणपत्रावरून विद्यापीठाने नियुक्त केलेल्या समितीकडून विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करतील)

Created by Neevia docuPrinter trial version

५.१३ प्रवेश यादीतील एखाद्या उमेदवारास प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, त्याने रु. १००/- इतकी रक्कम प्रवेश रद्द शुल्कापोटी ज्या कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश घेतला असेल त्याच कृषि तंत्र विद्यालयाकडे जमा करावी. उमेदवाराने प्रवेश रद्द न केल्यास पुढील प्रवेश फे-यांमध्ये त्या उमेदवाराचा प्रवेशाबाबत विचार केला जाणार नाही.

५.१४ जिल्हयातील सर्व रिक्त जागांचा तपशील प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालयातील प्राचार्यांनी घटक व संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्यांकडे प्रवेशाच्या संबंधीत कागदपत्रासह सादर करतील. घटक व संलग्न कृषि तंत्र विद्यालयांच्या प्राचार्यानी सर्व रिक्त जांगांचा तपशिल महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे जिल्हा प्रतिनिधीकडे जमा करावा. त्यानंतर जिल्हा प्रतिनिधी सर्व जागांचा तपशील संकेत स्थळावर अद्ययावत करतील. त्यानुसार संबंधित घटक व संलग्न विद्यालयाच्या प्राचार्यांनी त्याची एक प्रत घ्यावी.

५.१५ पहिल्या फेरीप्रमाणेच उर्वरित रिक्त जागांसाठी दुसरी फेरी राबविण्यात येईल.

५.१६ दुस-या फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी संवर्ग बदलून शासकीय नियमानुसार तिसरी फेरी राबविण्यात येईल.

५.१७ तिसरी फेरी संपल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी आवश्यकता वाटल्यास, पुनःश्च जाहिरात प्रसिध्द करून प्रवेश अर्ज मागविले जातील आणि पूर्वीच्या उमेदवारांचे प्रवेश अर्ज विचारात घेवून महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने गुणवत्तेनुसार प्रसिध्द केलेल्या अंतिम यादीनुसार प्रवेशप्रक्रिया राबविली जाईल.

५.१८ महात्मा गांधी आदिवासी जनता कृषि तंत्र विद्यालय, कोसबाडहिल, ठाणे येथे रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर व ठाणे जिल्हयातील फक्त आदिवासी उमेदवारांनी प्रवेशासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या अधिकृत अध्ययन केंद्रावर (ALC) जावून अर्ज करावा. कारण आदिवासी उमेदवारांकरिता कंसात दर्शविल्याप्रमाणे जिल्हानिहाय जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. रायगड (८), नाशिक (८), धुळे (८), नंदुरबार (८), अहमदनगर (८), ठाणे (१०).

## ६. आरक्षित जागा

महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठांतर्गत संस्थेमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | वर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी | |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतून बौध्दधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ | |
| २ | अनुसूचित जमाती | ७ | |
| ३ | अ. विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३ | नॉनक्रीमीलेअर तत्त्व लागू आहे. |
| | ब. भटक्या जमाती ब (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५ | |
| | क. भटक्या जमाती क (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ | |
| | ड. भटक्या जमाती ड (वंजारी व तत्सम जमाती) | २.० | |
| ४ | इतर मागास वर्ग | १९ | |
| | **एकूण** | **५०** | |

Created by Neevia docuPrinter trial version

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शेतकऱ्यांची मुले | ६ | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले | २ | |
| ७ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापित पुनर्वसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापित व्यक्ती आणि त्यांची मुले | ४ | |
| ८ | आजी व माजी सैनिकांची मुले | २ | |
| ९ | अपंग (४० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) | ३ | |
| १० | महिला | ३० | |

६.१ अनुक्रमांक ५ ते ९ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे.

६.२ भारतीय संविधानानुसार मंडळ आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजना विभाग क्र. टीईएम १०२४/(६३०३)/तांशि-१ दिनांक ३ जून १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात येतील.

६.३ गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागेवर एकूण प्रवेशक्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. (नॉन-क्रीमीलेअर दाखला आवश्यक)

६.४ रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रवेशक्षमतेच्या कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या, तर त्या जागा इतर सर्व प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात येतील, जसे अ.जा/अ.ज/वि.जा/भ.ज. आणि इतर मागासवर्गीय. तथापि या पध्दतीने आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, त्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६.५ संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

६.६ शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र. १५/मावक ५, दिनांक ५/६/२००६ अन्वये विमुक्त जाती अ, ब, भटक्या जमाती क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास वर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी क्रीमीलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही, म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

६.७ शासन निर्णय क्रमांक अेजीयु-२१९५/सीआर-७३/१९ अे, दिनांक ३/१/२००१ नुसार वरील प्रत्येक संवर्गात ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत. त्यात गुणवत्तेनुसार प्रवेश दिलेल्या मुलींचा समावेश असेल.

## ७. अधिभार

विद्यापीठाने पुरस्कृत केलेल्या कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे जादा अधिभार गुण देण्यात येतील.

Created by Neevia docuPrinter trial version

**अधिभार गुण (जास्तीत जास्त २० गुण)**

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवार शेतकरी कुटुंबातील असल्यास तलाठयाच्या स्वाक्षरी आणि दिनांकासही अलिकडील (२००९ व २०१०) चा ७/१२ चा उतारा अथवा भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील उमेदवार असल्यास, तहसिलदार यांचे प्रमाणपत्र जोडावे. | १२ टक्के |
| २ | उमेदवार तालुका/जिल्हा/राज्य स्तरावरील सांस्कृतिक कार्यक्रमात / क्रीडा स्पर्धेत भाग घेतला असल्यास जिल्हा शिक्षणाधिकारी / संचालक, सांस्कृतिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे शालान्त परीक्षा किंवा तत्पूर्वीचे प्रमाणपत्र जोडावे. | २ टक्के |
| ३ | उमेदवार एन.सी.सी./एम.सी.सी./स्काऊट गाईड सदस्य असल्यास शालान्त परीक्षा किंवा तत्पूर्वीचे समादेशकाचे किंवा मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र जोडावे. | २ टक्के |
| ४ | आपण कृषि परिषद / कृषि विद्यापीठ / सेवानिवृत्त / मयत कर्मचा-याचा मुलगा/मुलगी असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र जाडावे. | ३ टक्के |

## ८. अभ्यासक्रम अध्यापन आणि मूल्यमापन

८.१ पदविका तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे निर्धारित केलेल्या नियमानुसार वार्षिक परीक्षा पध्दतीने मूल्यमापन करण्यात येईल.

८.२ पदविका अभ्यासक्रमाची चाचणी, सहामाही इत्यादी परीक्षा या संबंधित विद्यालयांमार्फत घेतल्या जातील. सहामाही परीक्षा डिसेंबर मध्ये आणि वार्षिक परीक्षा एप्रिल/मे मध्ये घेतल्या जातील.

८.३ ठराविक कालावधीनंतर विद्यार्थ्यांना क्षेत्रीय प्रात्यक्षिके पूर्ण करावी लागतील. ही प्रात्यक्षिके अभ्यासक्रमानुसार आणि विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार असतील.

८.४ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष आणि व्दितीय वर्षाच्या वार्षिक परीक्षा विद्यापीठाकडून घेतल्या जातील.

८.५ प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान शेकडा ३५ गुण बौध्दिक व प्रात्यक्षिक परीक्षेत स्वतंत्रपणे मिळविणे अनिवार्य आहे. दोन्हींपैकी एखाद्या भागात विद्यार्थी नापास असेल, तर बौध्दिक आणि प्रात्यक्षिक अशी दोन्हींची त्याला परत परीक्षा द्यावी लागेल.

८.६ ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस प्राविण्यासह प्रथम श्रेणी दिली जाईल.

८.७ एकूण ६० टक्के आणि त्यापेक्षा अधिक आणि ७५ टक्के पेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला म्हणून जाहीर करण्यात येईल.

८.८ ४५ टक्के आणि त्यापेक्षा अधिक आणि ६० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला असे मानण्यात येईल.

८.९ ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळविणारा विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाला असे समजण्यात येईल.

८.१० एटीकेटी सवलत रद्द करून शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून ५ गुणांचा अधिभार जास्तीत जास्त दोन विषयांकरिता देण्यात येईल तसेच अधिभार दिल्यानंतर उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी विचारात घेवून श्रेणी देण्यात येईल.

Created by Neevia docuPrinter trial version

८.११ निकाल समितीने तयार केलेला निकाल कुलसचिव, कुलगुरुंच्या मान्यतेसाठी सादर करतील आणि कुलगुरुंनी संमत केलेला निकाल कुलसचिव जाहीर करतील.

## ९. प्रमाणपत्र

९.१ विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले प्रमाणपत्र विद्यापीठाच्या शिक्षण संचालकांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाद्वारे प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्याला देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यास रुपये १००/- (रुपये शंभर मात्र) इतके शुल्क विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

९.२ संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी शिफारस केल्यास द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला रुपये २५/- (रुपये पंचवीस मात्र) इतके शुल्क भरल्यास उपकुलसचिव (विद्या) यांच्या स्वाक्षरीने तात्पुरते प्रमाणपत्र देण्यात येईल.

## १०. परीक्षा शुल्क, परीक्षेचा अर्ज, प्रवेश पत्र इत्यादी

१०.१ प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या अंतिम परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नमुन्यामध्ये परीक्षेला बसण्यासाठी अर्ज करावा लागेल.

१०.२ विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेले परीक्षा शुल्क आणि गुणपत्रक शुल्क संबंधित संस्थांच्या प्राचार्यांकडे भरावे लागेल आणि प्राचार्य अर्जाची संपूर्ण छाननी करुन ते अर्ज, तथापि शुल्क मात्र डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नावे करुन, विद्यापीठाच्या कुलसचिवांकडे पाठवतील.

१०.३ कुलसचिवांच्या अधिपत्याखालील निम्नस्तर कृषि शिक्षण विभाग, सर्व अर्जांची छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांकाचे प्रवेश पत्र देईल.

१०.४ विद्या परिषदेने संमत केलेल्या परीक्षा कार्यक्रमानुसार कुलसचिव या अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षा प्रतिवर्षी एप्रिल/ मे मध्ये आयोजित करतील.

## ११. वैद्यकीय प्रमाणपत्र

या अभ्यासक्रमासाठी निवडलेला विद्यार्थी आरोग्यदृष्टया सुदृढ आणि सक्षम असला पाहिजे. याकरिता त्याने प्रवेश घेतेवेळी शासकीय मान्यताप्राप्त सक्षम आरोग्य अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र विहित नमुन्यात सही शिक्क्यानिशी सादर करावे.

## १२. उपस्थिती

अंतिम परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रथम/व्दितीय वर्षात एकूण ८० टक्क्यांपेक्षा जास्त उपस्थिती असणे आवश्यक आहे. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत वैद्यकीय अथवा तत्सम कारणास्तव कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य उपस्थितीत ५ टक्के सवलत देतील. याकरिता संबंधित कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांकडे विद्यार्थ्यांने आवश्यक त्या दाखल्यासह अर्ज सादर करावा.

## १३. पुनःप्रवेश

एखाद्या विद्यार्थ्याने कृषि पदविका अभ्यासक्रम मध्येच सोडून नंतर पुनःप्रवेशासाठी अर्ज केल्यास अशा प्रकरणामध्ये विद्यार्थ्याची प्रथम वर्षातील हजेरी ८० टक्के भरलेली असावी. अशा विद्यार्थ्यांचाच पुनःप्रवेशासाठी विचार केला जाईल. तसेच पाच वर्षाच्या आत अशा विद्यार्थ्यांस पुनःप्रवेश घेता येईल. परंतु, त्या वेळेस सदरचा अभ्यासक्रम चालू असणे गरजेचे आहे.

Created by Neevia docuPrinter trial version

## १४. पुनःपरीक्षा

अंतिम वर्षाच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या तसेच प्रथम वर्षाच्या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास पुढील वर्षी होणाऱ्या संबंधित वर्गाच्या परीक्षेत बसण्याची सवलत, संबंधित संस्थेचे प्रमुख अर्जासहीत खालीलप्रमाणे शुल्क घेऊन देतील.

| | | |
|---|---|---|
| १ | परीक्षा शुल्क | रुपये ६००/- (रु. सहाशे फक्त) |
| २ | गुणपत्रक शुल्क | रुपये ५०/- (रु. पन्नास फक्त) |
| | **एकूण** | **रुपये ६५०/- (रु. सहाशे पन्नास फक्त)** |

## १५. विद्यार्थ्यांची जबाबदारी

पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्वसामान्य बाबींची पूर्णपणे माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांनी या बाबींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील असणे अपेक्षित आहे. त्यांनी विद्यालयाशी सतत संपर्क साधून असले पाहिजे. केवळ नियमाविषयी अज्ञान हे त्या अस्वीकृतीला कारण होऊ शकणार नाही.

## १६. शैक्षणिक सहली

निर्धारित केलेल्या शैक्षणिक सहलींचे आयोजन अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल.

## १७. वसतीगृह निवास

सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मर्यादित प्रमाणात विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह निवास व्यवस्था उपलब्ध आहे. प्रवेश देण्यात आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांस संबंधित शिक्षण संस्थेच्या वसतीगृहामध्ये निवासाची सोय उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

## १८. अनुचित गैरशिस्त वर्तन

विद्यापीठामध्ये प्रचलित असलेल्या विनियम व परिनियमातील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीबाबत अथवा गैरशिस्तीबाबत कार्यवाही केली जाईल.

Created by Neevia docuPrinter trial version

## १९. शैक्षणिक शुल्क

| अ.क्र. | शुल्काचा तपशील | अनुदानित विद्यालयांची शुल्क आकारणी | | विनाअनुदानित विद्यालयांची शुल्क आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष |
| अ) शुल्क (रूपये) | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | २५०० | २५०० | १०००० | १०००० |
| २ | प्रवेश शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | २००• | २००• | २००• | २००• |
| ३ | नोंदणी शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | १००• | १००• | १००• | १००• |
| ४ | वाचनालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ५ | अंतर्गत परीक्षा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ६ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| ७ | परीक्षा शुल्क प्रती विद्यार्थी (विद्यापीठाकडे जमा) | ६००• | ६००• | ६००• | ६००• |
| ८ | अनामत शुल्क (परत होणारे) | १००** | - | १००** | - |
| ९ | गुणपत्रक शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | ५०• | ५०• | ५०• | ५०• |
| १० | प्रमाणपत्र शुल्क (विद्यापीठाकडे जमा) | - | १००• | - | १००• |
| ११ | ओळखपत्र | ३० | - | ३० | - |
| १२ | वैद्यकीय शुल्क | २० | २० | २० | २० |
| १३ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १० | १० | १० | १० |
| | **अ एकूण** | **३९६०** | **३९३०** | **११४६०** | **११४३०** |
| अ.क्र. | शुल्काचा तपशील | अनुदानित विद्यालयांची शुल्क आकारणी | | विनाअनुदानित विद्यालयांची शुल्क आकारणी | |
| | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष |
| ब) वस्तीगृहात राहू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी फक्त | | | | | |
| १४ | वसतीगृह शुल्क | ७००* | ७००* | ७००* | ७००* |
| १५ | भांडी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| १६ | भोजनगृह आगावू रक्कम | ५००** | - | ५००** | - |
| १७ | विद्युत बील आकार | ७००* | ७००* | ७००* | ७००* |
| | **एकूण ब** | **२०००** | **१५००** | **२०००** | **१५००** |
| | **एकूण (अ + ब)** | **५९६०** | **५४३०** | **१३४६०** | **१२९३०** |

* सेवा उपलब्ध असल्यास ** विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम • विद्यापीठाकडे भरणा करणे

टिप : १. वसतीगृह शुल्क, भांडी शुल्क, मेस डिपॉझीट, विद्युत आकार हे प्रवेशाचे वेळी घेण्यात येऊ नये. प्रवेश नियमीत झाल्यानंतर उपरोक्त सेवा उपलब्ध असल्यास याबाबतचे शुल्क आकारण्यात यावे. सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारू नये.

Created by Neevia docuPrinter trial version

२. अनामत रक्कम, मेस डिपॉझीट इ. रकमा दुसरे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.

३. एखाद्या विद्यार्थ्यांने प्रवेश प्रक्रियेच्या अंतीम फेरीपुर्वी प्रवेश रद्द केल्यास, फक्त प्रवेश शुल्क वजा करून उर्वरित रक्कम परत केली जाईल. अंतीम फेरीनंतर प्रवेश रद्द केल्यास, फक्त अनामत रक्कम परत केली जाईल. मात्र प्रवेश रद्द करणा-या उमेदवारास प्रवेश रद्द करण्याचे शुल्क रूपये ३००/- विद्यापीठाकडे भरणा करावी लागेल त्यानंतर त्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

## २०. सूचना

२०.१ विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क, शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क, जिमखाना शुल्क व सुरक्षा अनामत रक्कम भरल्यानंतरच, प्रवेश दिला आहे असे समजण्यात येईल.

२०.२ कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश घेतल्या नंतर प्रवेश रद्द करणाऱ्या उमेदवाराला प्रवेश रद्द करण्याचे शुल्क रुपये ३००/- विद्यापीठात भरावे लागेल. त्यानंतरच त्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

२०.३ विद्यार्थ्यांची प्रतीवर्षी संस्थेमार्फत वैद्यकीय तपासणी केली जाईल.

२०.४ विद्यार्थी सुरक्षा विमा : संस्थेमार्फत विद्यार्थ्यांचा गट विमा काढला जाईल.

२०.५ व्यवस्थापन कोटयाचे शुल्क रु. १०,०००/- या रक्कमेच्या जास्तीत जास्त पाच पट राहील. सदर जागा प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जास्तीत जास्त १५ दिवसांच्या आत संस्थाचालकांनी भरून त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाला मंजूरीसाठी सादर करावे. व्यवस्थापन कोटयाचे उमेदवार निवडताना ते गुणवत्ता सूचीतीलच घेण्यात यावे. गुणवत्ता सूचीच्या बाहेरील उमेदवाराला प्रवेश देता येणार नाही.

२०.६ खाजगी संस्थांकरिता विहीत केलेले अध्यापन शुल्क दोन सत्रात भरावे. त्यापैकी ५० टक्के प्रवेशाच्या वेळी आणि ५० टक्के सहामाही परीक्षेनंतर भरावेत.

Created by Neevia docuPrinter trial version

## २१ कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम प्रवेश कार्यक्रम २००१०-११

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्री सुरू होण्याचा दिनांक | २२/६/२०१० |
| २ | अर्ज विक्री व संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ११/७/२०१० |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १७/७/२०१० |
| ४ | तक्रार अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक | २०/७/२०१० |
| ५ | तक्रार निवारण समितीची बैठक | २४/७/२०१० |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २७/७/२०१० |
| ७ | जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय पहिली प्रवेश यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ३०/७/२०१० |
| ८ | प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीचा कालावधी | ३१/७/२०१० ते २/८/२०१० |
| ९ | प्रवेश प्रक्रियेच्या दुस-या फेरीचा कालावधी | ६/८/२०१० ते ८/८/२०१० |
| १० | प्रवेश प्रक्रियेच्या तिसरी फेरीचा कालावधी | १२/८/२०१० ते १४/८/२०१० |
| ११ | विद्यापीठस्तरीय प्रवेश फेरी | २१/८/२०१० ते २३/८/२०१० |
| १२ | शैक्षणिक वर्ष सुरू होण्याचा दिनांक | १६/८/२०१० |

Created by Neevia docuPrinter trial version

**परिशिष्ठ - १**

**शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र (नमूना)**

(तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या सहीचे)

१) श्री/श्रीमती ------------------------------------------------ राहणार -------------------- ता. -------------------- जि. ------------------------- भूमीहीन असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ शेतमजूरीवर चालतो. त्यांनी ------------------------------ या साली श्री./श्रीमती ----------------------- --------------------------------------- (जमीनधारकाचे नाव) मौजे. --------------------- ता. ------------------- जि. -------------------------यांच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम केले आहे.

२) खाली नमूद केलेला पुरावा तपासल्यानंतर श्री./श्रीमती ------------------------------------ ----- --------------------------------- (उमेदवाराचे नाव) हे वरील शेतमजुराचा/ची मुलगा/मुलगी/पत्नी आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

पुरावा - १) ----------------------------------------------------------------------------------- ----------------------------------------------------------------------------------------------

सील

स्थळ : सही

दिनांक : हुद्दा

टिप : १) जे उमेदवार भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील आहेत असा दावा करतात व ज्यांच्या कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न शेतमजूरीवरच आहे अशांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) हे प्रमाणपत्र उमेदवाराच्या किंवा त्यांच्या इतर नातेवाईकांच्या नावाने असल्यास अधिभार देण्याच्या दृष्टीने ग्राहय धरले जाणार आहे.

३) ज्याची जरुरी नाही ते खोडावे.

४) ह्या प्रमाणपत्रात संबंधित शेतमजूर ज्या जमीनधारकाच्या शेतावर काम करतात, त्या जमीनधारकाचे संपूर्ण नाव इत्यादी सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे,अन्यथा यासंबंधी अधिभार देता येणार नाही.

Created by Neevia docuPrinter trial version

## परिशिष्ठ - २

## शेतकरी असल्याचा दाखला (नमूना)

(तहसिलदार/नायब तहसिलदार यांच्या सहीचे)

दाखला देण्यात येतो की, श्री./कुमार/श्रीमती ------------------------------------------ ----- ---------------------------------------- (अर्जदाराचे नाव) यांचे श्री./श्रीमती ------------------------- --------------------------------------------------- आई/वडील/आजोबा/आजी (पितृकुलाकडील जमीनधारक) राहणार --------------------------- ता. ------------------ जि. ---------------------- यांनी जमीन मालक या नात्याने धारण केलेले जमीन क्षेत्र, हेक्टर ----- आर ---------हे जमीन महसूल कायदा ------------------------------------------------------ प्रमाणे मर्यादित आहे.

असेही प्रमाणित करण्यात येते की, ते/त्या स्वतः शेती करीत असून शेती हेच त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

स्थळ : सील सही

दिनांक : नाव

हुद्दा

Created by Neevia docuPrinter trial version

## परिशिष्ठ - ३
## वैद्यकीय दाखला (नमूना)
### (सक्षम नोंदणकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने जारी केलेला)
### (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)

मी प्रमाणित करतो की कुमार/कुमारी ------------------------------------------------ याची/हिची संपूर्ण वैद्यकीय तपासणी केली आहे व त्यावरून खालीलप्रमाणे दाखला देत आहे.

१) त्याला/तिला काहीही दृष्टीदोष नाही.

२) त्याला/तिला श्रवणशक्तीचा कुठलाही त्रास नाही.

३) त्याला/तिला कुठलाही आजार नाही, शारीरिक व्यंग किंवा मानसिक वैगुण्य नाही जेणेकरून सध्या किंवा भविष्यात तो/ती दैनंदिन कामकाज किंवा अध्ययनास (शेतावरील किंवा प्रयोगशाळेतील कामास) अपात्र ठरेल.

(विद्यार्थ्यांची सही)
ठिकाण :
दिनांक :

नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याची सही
नांव :
नोंदणी क्रमांक :

टिप : १. वैद्यकीय प्रमाणपत्र वरील विहित नमुन्यातच सादर करावे.

२. वैद्यकीय अधिकारी शासकीय सेवेत असल्यास दाखल्यावर कार्यालयाचे सील असणे आवश्यक आहे.

Created by Neevia docuPrinter trial version